महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय विस्तार इमारत, ४ था मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८५४३०३
Email ID : **desk16a.gad-mh@gov.in**

---

क्र. संघटना १५२२/प्र.क्र.५६/का. १६-अ दि. १५ मार्च, २०२२

प्रति,

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय :- महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ अनुसार शासन मान्यताप्राप्त संघटना तसेच नियोजित संघटनेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ** :- १) साप्रवि, शासन परिपत्रक क्र. संघटना १५१४/प्र.क्र.२१/१६-अ, दि. १८.०३.२०१५
२) साप्रवि, शासन परिपत्रक क्र. संघटना १५१४/प्र.क्र.२५०/१६-अ, दि. १८.०३.२०१५
३) साप्रवि, शासन परिपत्रक क्र. संघटना १५१५/प्र.क्र.१३८/१६-अ, दि. २१.०७.२०१५
४) साप्रवि, शासन परिपत्रक क्र. संघटना १५१६/प्र.क्र.२७३/१६-अ, दि. ०२.०१.२०१७

महोदय / महोदया,

शासकीय कर्मचारी (औद्योगिकेतर) यांच्या संघटनांना महाराष्ट्र नागरी (सेवा) वर्तणूक नियम, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच “नवीन आदर्श नियम” ची घटना व नियमांच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येते. अशा मान्यता देताना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी कार्यरत शासन मान्य संघटना तसेच प्रस्तावित संघटनांच्या बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी -

१) सर्व विभागांनी संदर्भाधीन क्र. ४ येथील दि. ०२.०१.२०१७ रोजीच्या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या संघटनांच्या यादीतील आपल्या विभागाच्या आस्थापनांशी संबंधित शासन मान्यता प्राप्त संघटना कोणत्या आहेत याचा आढावा घ्यावा. सदर यादीत शासन

मान्यता प्राप्त असलेल्या एखाद्या संघटनेच्या नावाचा समावेश करायचा राहून गेला असल्यास सदर संघटनेच्या सर्व कागदपत्रांसह तसे या विभागास कळवावे.

२) विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यरत संघटनांची वर्गनिहाय यादी तयार करावी.

३) सर्व कार्यरत संघटनांकडून सध्याच्या पदाधिकाऱ्यांची यादी तसेच मागील तीन आर्थिक वर्षाची (वित्तीय वर्ष २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१) आर्थिक विवरणपत्रे (आवक/जावक, जमाखर्च, हिशेब तसेच मत्ता व दायित्व यांचा हिशेब दर्शविणारे विवरणपत्र) लेखापरीक्षण अहवालासह मागवून घ्यावीत.

४) दि. २.०१.२०१७ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या संघटनांच्या यादीतील एखादी संघटना आता अन्य नावाने कामकाज करीत असल्यास संघटनेच्या नाव बदलाचा प्रस्ताव संदर्भाधीन क्र. ३ येथील दि. २१.०७.२०१५ रोजीच्या परिपत्रकातील तरतुदीनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी पाठवावा.

५) दि. २.०१.२०१७ या शासन परिपत्रकासोबतच्या यादीतील बऱ्याच संघटना या १९७९ पूर्वीच्या आहेत. संबंधीत प्रशासकीय विभागांनी अशा संघटनांकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २९, नियम ३० अनुसार "नवीन आदर्श नियमाची घटना व नियमा" ची प्रत प्राप्त करून त्यास या विभागाची मान्यता घ्यावी.

६) विभागाने प्रस्तावित संघटनेचा प्रस्ताव संदर्भ क्र. २ येथील दि. १८.०३.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार तपासावा. असे करताना प्रत्येक वर्गाची एक संघटना कार्यरत असल्याबाबत दक्षता घ्यावी, जिल्हानिहाय / संवर्गनिहाय संघटनेचे प्रस्ताव सादर करू नयेत. प्रत्येक प्रस्तावित संघटनेकडून महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियमाचे (MESMA) चे उल्लंघन होणार नाही" असे शपथपत्रात नमूद करून घ्यावे.

७) सर्व शासन मान्य संघटनांवर संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने संनियंत्रण करावे.

८) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सदर बाब आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय / आस्थापना यांच्या निदर्शनास आणावी.

९) उपरोक्त मुद्दा क्र. १ ते ५ बाबत सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तपासणी करून सामान्य प्रशासन विभागाकडून दि. ०२.०१.२०१७ सोबतच्या संघटनांची यादी सुधारीत करण्यात येईल.

यास्तव आपणांस विनंती करण्यात येते की, उक्त अ.क्र. १ ते ५ बाबतची सविस्तर माहिती या **विभागास दि. ३०.०६.२०२२ पर्यंत सादर करावी.**

सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२२०३१५१६२३०९७४०७ असा आहे. हे शासन पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

आपला,

MADHUKAR SARJERAO GHOGARE

Digitally signed by MADHUKAR SARJERAO GHOGARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=539635e59a0a994a979279d79261fa9f3f9070d1a37dfe29dbc4be5d1c827801, pseudonym=AC3147DBADAD7F4C4CB2DE528E143189B6FA5D3D, serialNumber=344B951816C517FCEA0454E21D7FDE25CC87830C180514DAFD445EC2BC6B50BF, cn=MADHUKAR SARJERAO GHOGARE
Date: 2022.03.16 16:56:22 +05'30'

**( म. स. घोगरे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत - साप्रवि - १६-अ संग्रहार्थ**